# 139 व्या रासेयो ओरिएन्टेशन कोर्स मधील अनुभव

**प्रा. डॉ. बालाजी व्ही. डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता.चाकूर जि.लातूर

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी म्हणून शैक्षणिक वर्ष 2017-2018 या वर्षापासून पहिल्यांदाच माझी मा. प्राचार्य साहेबांनी नियुक्ती केली आणि माझ्या मनाची धाक-धुक सुरू झाली. खरे पाहता आमच्या महाविद्यालयाला इ.स. 2002 साली रासेयो विभागाचे प्रथम युनिट मिळाले आहे. त्यावर्षी मला सहकार्यक्रमाधिकारी म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली होती. तसे पाहिले तर थोडाफार अनुभव विद्यार्थी जीवनापासूनच स्वयंसेवक असल्याचा होता. तरी परंतु कार्यक्रमाधिकारी म्हटले की, आर्थिक, सामाजिक जबाबदारी आली त्याचबरोबर विद्यार्थ्यांशी जास्तीत जास्त जुळवून व स्नेह ठेऊन रहावे लागते. याची मनात घालमेल चालू होती. या परिस्थितीत नियमित आणि वार्षिक कार्यक्रमही फेब्रुवारी पर्यंत घेण्यात आले. या कार्याला प्रशासकीय स्वरूप येण्यासाठी आणि अधिक प्रगती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग अहमदनगर कॉलेज अहमदनगर येथील प्रशिक्षण कोर्स करण्याची आवश्यकता आहे. असे सगळीकडून सांगण्यात येऊ लागले. माझ्या अगोदर अनेकांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यात कांही नवीन नाही. परंतु माझ्यासाठी हे नवीनच होते. विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव वृध्दिंगत करणे व त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणणे. 22 फेब्रुवारी 2018 ते 28 फेब्रुवारी 2018 या कालावधीत अहमदनगर कॉलेज अहमदनगर येथे संपन्न होणाऱ्या 139 व्या रासेयो ओरिएन्टेशन कोर्ससाठी नळेगावहून 21 फेब्रुवारी 2018 रोजी संध्याकाळी लातूर येथे पोहचलो. या दिवसी संध्याकाळी लातूरहून संध्याकाळी ठिक 9.00 वाजताच्या विश्व ट्रॅव्हल्स ने (मी आणि प्रा. डॉ. केशव आलुगले जयक्रांती कनिष्ठ महाविद्यालय लातूर) दोघेही प्रवास करून 22 फेब्रुवारी 2018 रोजी पहाटे पाच वाजता मजल दरमजल करीत अहमदनगर कॉलेज अहमदनगर येथे लातूर - नाशिक रोडवरील कॉलेज गेटसमोर आमच्या दोघांची स्वारी उतरली. दोघांकडेही खुप मोठया वजनदार बॅगा होत्या. सात दिवसाचा बिस्तरा लागणारा त्यात होता. हे बिऱ्हाड डोक्यावर घेऊन आनंदी अशा पहाटेच्या झुळ झुळ वाऱ्याच्या झुळका लागत होत्या. अशा वातावरणात आम्ही झुंजुरक्या पाच नंबरचे मुलांचे वस्तीगृह शोधत निघालो. श्री साबळे या लिपिकास फोन लाऊन सर्व पत्ता विचारून घेऊन आमचे बिऱ्हाड वस्तिगृहातील खालच्या मजल्यात उतरले. तेंव्हाच श्वास सोडला तसे पाहिले तर अहमदनगर कॉलेजचे कॅम्पस 46 एकरचे असे मोठे आहे एक मिनी विद्यापीठच वाटते. हे अहमदनगर व परिसरातील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन 1947 ला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या कॉलेजची स्थापना केलेली आहे. या कॉलेजचे पहिले प्राचार्य डॉ. बी. पी. हिवाळे यांनी जो आदर्श घालून दिला आहे. त्याच पावलावर पाऊल ठेऊन चालत आहे. हे सर्व पहाटेच्या वेळी महाविद्यालयाचा परिसर पाहून आनंद वाटला. मन कांही वेळातच रमले. पहाटेपासून कांही झोप आली नाही. लगेच दैनंदिन सवयीमुळे मी लगेच प्राणायाम, सूर्यनमस्कार, योगासने करायला सुरूवात केली. सकाळी मात्र वरच्या मजल्यावरील रूममध्ये आम्हांला वॉचमन श्री पाखरे मामा यांनी आमची चांगली राहण्याची व्यवस्था केली. पहिलाच दिवस असल्यामुळे आंघोळीसाठी गरम पाणी मिळाले नाही. थंड पाण्यानेच आंघोळ उरकून घेतली आणि महाविद्यालयाच्या परिसरातच रासेयो विभाग होता. वस्तिगृह ते रासेयोविभाग चालत जाण्याचे अंतर फक्त 5 मिनीटांचे होते. जाताना मध्येच जवळच रस्त्यात नाष्टा व जेवणाची मेस होती अगोदर नाष्टा करूनच आम्ही निघालो. रासेयो विभागात गेल्यानंतर सकाळी 9.30 वाजता नोंदणी करण्यात आली. असा आमच्या कोर्सचा श्रीगणेशा सुरू झाला.

दि. 22 फेब्रुवारी 2018 रोजी पहिल्या सकाळच्या सत्रात उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. रासेयो समन्वयक डॉ. अभय शालाग्राम व डॉ. शरद बोरूडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर आमच्या 21 जणांच्या चिठ्ठया घेऊन गुप्तपणे आमच्यापैकीच एक जणाची म्हणजे प्रा. कलाप्पा चिकटे यांची अध्यक्ष म्हणून निवड घोषीत करण्यात आली. त्यांनी उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भुषविण्याचा मान प्रा. चिकटे यांना मिळाला. हे असे इतर कुठल्याही कोर्समध्ये घडत नाही. हे खरेच नाविण्यपूर्ण वाटले. हा या विभागातील माणसांच्या मनाचा मोठेपणा पहिल्यांदाच अनुभवायला मिळाला. प्रा. डॉ. अभय शालिग्राम सरांनी अहमदनगर कॉलेजच्या

स्थापनेपासूनचा सखोल असा इतिहास सांगितला. या महाविद्यालयात एकूण 24 पदव्युत्तर विभाग, 08 संशोधन केंद्रे, कला, विज्ञान, वाणिज्य अशा अनेक शाखा व कोर्स या कॉलेजमध्ये चालतात असे नम्रपणे मांडले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि प्रशिक्षण केंद्र अहमदनगर शहरातच का सुरू झाले? याची अतिशय वास्तव अशी माहिती डॉ. शालिग्राम सरांनी मांडली ते म्हणाले की, स्वावलंबन, चारित्र्यसंवर्धन व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा अंगिकार नवीन शिक्षण प्रणालीत विकसीत करण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे 24 सप्टेंबर 1969 साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत संस्कारच्या युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात आले. ही संकल्पना राबविण्याचे श्रेय महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांनाच जाते. स्वातंत्र्यानंतर देशातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय युवकांनी समाजाच्या सेवेसाठी कांही ठोस असे कार्य केले पाहिजे. आपला भारत देश 80 टक्के खेडयांचा व कृषीप्रधान देश आहे. खेडी सुधारली तर राष्ट्र सुधारते आणि खेडयातील जनतेला स्वातंत्र्याची सर्व फळे खाता येतील यासाठी त्यांना कार्यप्रवण केले पाहिजे. म्हणून 1952 मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेत समाजसेवा आणि शारीरिक श्रम यावर अधिक भर देणारी विद्यार्थ्यांची शिबिरे आयोजित करण्याची योजना आखली. 1958 मध्ये जवाहरलाल नेहरूंनी महाविद्यालयीन आणि विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण पूर्ण करताना 9 महिन्यांपासून ते एक वर्षापर्यंत समाजसेवेचे ग्रामीण भागात कार्य करावे अशा प्रकारची एक योजना आखावी असे सुचविले. 1959 च्या शिक्षणमंत्र्याच्या दिल्ली येथील बैठकीत अशा प्रकारची योजना तयार करावी म्हणून समितीची स्थापना डॉ. सी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली. या समितीने अतिश महत्वाच्या शिफारशी केल्या 1960 मध्ये प्रा. केजी सय्यदीन यांनी विविध देशांचा अभ्यास करून नॅशनल सर्व्हिस फॉर द युथ हा अहवाल दिला. 1964 मध्ये भारत सरकारच्या शिक्षण सुधारणा आयोगाचे अध्यक्ष डॉ. दौलतसिंह कोठारी यांनी आपल्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांनी समाजसेवा करण्यासंबंधी कोणत्या प्रकारच्या योजना राबवाव्यात यासंबंधीची शिफारस केली. मे 1969 मध्ये कुलगुरूंच्या उपसमितीची बैठक होऊन रासेयोचा मसुदा तयार करण्यात आला आणि 24 सप्टेंबर 1969 रोजी त्यावेळचे शिक्षणमंत्री डॉ. व्ही.के.आर.व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवायोजना सुरू केली. महात्मा गांधी यांनी 'खेडयाकडे चला' अशी जी हाक दिली होती. त्या विचारांना राबविण्यासाठी पंडित नेहरू यांचे स्वप्न साकार करण्यासाठी ही योजना शासनाच्या मदतीने सुरू करण्यात आली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी या योजनेमुळे महाविद्यालयीन विद्यापीठीय युवकांना राष्ट्रीय छात्र सेनेप्रमाणे समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची नवी संधी मिळत आहे, असे म्हटले होते. स्वामी विवेकानंदानीही ही संकल्पना मांडली. (N.S.S. Voluntreers wprk Dairy) असे रासेयोचा इतिहास डॉ. अभय शालीग्राम सरांनी आम्हांला सांगितला. याच संकल्पनेतून अर्थशास्त्रज्ञ डॉ. हुबळे सर यांनी या तत्वानुसार महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांची रासेयोची संकल्पना राबविण्यासाठी अहमदनगर कॉलेजने रासेयो सुरू केले. भारतातील हे रासेयो प्रशिक्षण देणारे पहिले केंद्र निर्माण केले. देशातील रासेयोचा पहिला कँप या महाविद्यालयाने घेतला. Ioc 2008 ला बंद झाले आणि 2011 मध्ये Enrolled Training Institute National Service Scheme. कोर्स सुरू झाले. NSS Philosophy in nut - Shell :- The the Philosophy of the National Service Scheme is essentially the Philosophy of a larger life. The essential problem of life. is the basic moral problem, the urges of the self to higher ends. What exactly is the meaning of the christian Maxim 'Die to life' must be hapnessed to the well being fo our Fellowmen. The before the motto of NSS is "NOT ME BUT YOU" "माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी आहे." हेच रासेयोचे सूत्र आपण सर्वांनी या सात दिवसाच्या प्रशिक्षणातून घेऊन आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवक व वार्षिक शिबिरांच्या माध्यमातून समाजात रुजवायचे आहे. असे सखोल मार्गदर्शन आपल्या अनमोल अशा वाणीतून केले. आम्हांला डॉ. शालीग्राम सरांनी मंत्रमुग्ध करून सोडले. आणि आमच्या मनात राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रमाधिकारी म्हणून घडविण्याचे कौशल्य निर्माण होण्यासाठीची मुहूर्तमेढ रोवली.

दि. 22 फेब्रुवारी 2018 रोजी सकाळचे उद्घाटन सत्र संपल्यानंतर रासेयो समन्वयक डॉ. शरद बोरूडे यांनी "आईस ब्रेक" या विषयावर माहिती दिली. रासेयो मध्ये कोणत्याही व्यक्तीला पदाचा कधीच मोह नसतो. स्त्री-पुरूष असा भेद नसतो. वयाची मर्यादा, गर्व, अहंकार, ताठा, मद, मत्सर, द्वेष यांचा कार्यक्रमाधिकाऱ्यात लवलेशही नसावा. त्याचबरोबर जात-धर्म-भाष-पंथ यांच्या सीमा ओलांडून समाजात कार्य करण्याची गरज आहे. असे सांगितले तसेच आपल्यामध्ये स्नेह, बंधुभाव, प्रेम, सर्वधर्मसमभाव, न्याय, समता या मूल्यांची रूजवणूक होऊन विकसीत व्हावीत. समाजात या मूल्यांचे संस्कार करण्याचे कार्य रासेयोच्या माध्यमातून कार्यक्रमाधिकारी यांनी करायचे आहे. यासाठी आपल्याला प्रत्येकाला अडनाव घेऊन न बोलता अधि कनिष्ठ संबंध अतूट असे नाते जपण्यासाठी जिव्हाळा निर्माण करण्यासाठी प्रथम एकमेकांचे नाव घेऊनच संवाद साधावा असे कौशल्य सांगितले. सर्वच 21 कार्यक्रमाधिकाऱ्यांना वर्गाच्या बाहेर घेऊन जाऊन महाविद्यालयाच्या परिसरातील मोकळया जागेत गोल रिंगण करून थांबवले आणि प्रत्येकाने स्वत:पासून फक्त नाव सांगत बाजूची सर्व नावं सांगण्यास सांगितले. तर कांहीजणांना आठवत नव्हते. मानसशस्त्रीय दृष्टया स्मरण हे कौशल्य विकसीत करण्याचे एक माध्यम

आहे. हे सोपे वाटते; पण कानावर एखाद्याचे फक्त नाव उच्चारल्याबरोबर परत पाच दहा नावे सांगा म्हटलं तर जमत नाही. नेमके तेच घडले. काही असो पण आम्ही नंतर सात दिवस एकमेकांना नावानेच बोलत होतो. ही एकात्मता निर्माण करण्याचे एक मोठे साधन आहे. तसेच तेथील भेदभावच उरत नाही पूर्ण गळून जातो. आणि बंधूभाव वाढीस लागतो. असाच बंधुभाव आपल्याला रासेयोच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये निर्माण करून ग्रामीण भागातील समाजात जागृतता निर्माण करायचे आहे. असे कौशल्ये तेथे आम्हांला सरांकडून शिकता आली आहेत.

23 फेब्रुवारी 2018 रोजी सकाळच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. सुनील जे. कवडे सरांनी "युथ प्रोफाईल" या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, चीन-अमेरिका-भारत हे देश महासत्ता बनण्यासाठी धडपडत आहेत. महासत्ता बनण्यासाठी कांही निकष पार पाडावे लागतात. त्यासाठी आर्थिक स्थैर्य, समर्थ राजकारण, मंडल आयोग शिफारशींची अंमलबजावणी, शुध्द नैसर्गिक पर्यावरण, संशोधन, अन्नधान्याचा मुबलक साठा आवश्यक असतो. जपान, जर्मनी, साऊथ आफ्रिका, चीन, भारत अशा देशांकडे सुपर पावर नेतृत्व आवश्यक असते.

आपला भारत देश महासत्ता बनण्यासाठी कांही अडचण नाही. चीनलाही अडचण नाही, 2010 ला 120 कोटी लोकसंख्या आपल्या देशाची होती. उत्पादन क्षमतेनुसार 15 ते 20 वर्षे वयोगटाची लोकसंख्या 96 कोटी 20 लाख 2010 ला होती. 2030 ला सर्वाधिक लोकसंख्येमध्ये असणारा तरूणांचा भारत देश राहणार आहे. चीनला आपल्या देशातील लोकसंख्येच्या तुलनेत लोकसंख्या वाढवण्यासाठी वेळ लागणार आहे. परंतु विविध कौशल्य असणाऱ्या तरूणांची गरज आहे. 2009-2010 पासून विविध कौशल्य विकासाच्या योजना आखलेल्या आहे. अभियंत्रिकी कॉलेज, विद्यापीठांमध्ये कौशल्य विकास विषय, दीन दयाळ उपाध्याय कौशल्य योजना, प्रमोद महाजन कौशल्य योजना, महात्मा गांधी कौशल्य या योजना तरूणांसाठी आखलेल्या आहेत. सर्व शाखांचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, इंजिनिअरींग विद्यार्थ्यांचा काय बनणार याचा गोल निश्चित केलेला असतो. मात्र कलाशाखेतील विद्यार्थ्यांमधील कौशल्य कमी होत आहेत. डोकं, ऱ्हदय, हात या तिन्ही अंगाला काम आजच्या शिक्षणातून मिळत नाही. तरी सुध्दा 15 ते 29 वयोगटातील युवकांकडे सरकारने लक्ष देण्याचे ठरविलेले आहे. यांना थिंकिंग स्किल शिकवायचे आहे. यांच्यात सेल्फ अव्हेरनेस (स्वतः जागरूक), (आपल्या सभोवती काय चाललय याची माहिती असणे आवश्यक आहे.) राजकीय, सामाजिक, धार्मिक, भौगोलिक, सांस्कृतिक माहिती असणे आवश्यक आहे. सामाजिक भान, ध्येय काय असावं हे आजच्या विद्यार्थ्यांना माहित असणे आवश्यक आहे. एखादे मोठे ध्येय गाठण्यासाठी तेवढीच स्वतःकडे क्षमता असावी लागते. तरच मोठं स्वप्न बघावं साकार नाही झालं, तर निराशा पदरी येते. आपल्या अंगी गुण, क्षमता आहेत का? हे पाहूनच मोठी स्वप्न पहावे. समस्या पाहून निर्णय घ्यावे. सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूण करत आहेत. आजची युवा पिढी मानसिक दृष्टया कमकुवत आहे. त्यांना मानसिक दृष्टया सबळ बनण्याची आवश्यकता आहे. सुरूवातीलाच ए.बी.सी.डी. प्लॅन तयार करायचा असतो. तेंव्हाच जीवनात अडचण येत नाही.

युथ ऑफ इंडियाचे आपल्याला विस्मरण झाले आहे. 15 ते 29 वयोगटाच्या युवकांचा एकसारखा विचार करणे चुकीचे आहे. ज्ञान, बुध्दिमत्ता ग्रामीण भागात कमी दिसून येते. ग्रामीण भागात भौतिक सुविधांचा अभाव आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ कमी आहे. संगणक आहेत पण लाईट नाही. अशी परिस्थिती ग्रामीण भागात आहे. आत्मविश्वासाचा अभाव असतो. नेमकी भुमिका नाही तर शहरी युवकांमध्ये रिलेशनशिप, फ्रेंडशिप, मोबाईल, फेसबुक, इंटरनेट यांचे थैमान माजले आहे. ग्रामीण व शहरी युवक असा फरक करायलाच हवा. सामाजिक कौशल्य युवकांमध्ये रूजवण्याची आवश्यकता आहे. शहरात फक्त भ्रष्ट नक्कल करण्यावर युवकांचा भर असतो. रोल मॉडेल व्यक्ती आज काळाच्या पडद्याआड गेली आहे. डॉ. मधु दंडवते, यशवंतराव चव्हाण, अटलबिहारी वाजपेयी, पोपटराव पवार, समाजसेवक अण्णा हजारे, बाबा आमटे, अभय राणे, नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे हे सामाजिक क्षेत्रातील रोल मॉडेल व्यक्ती आहेत. यांचे विचार युवकांनी आत्मसात करावे. 'व्यक्ती आणि वल्ली' पु.ल. देशपांडे लिखित ग्रंथातील 'चितळे मास्तर' यांची भुमिका युवकांनी वाचण्यासारखी आहे. आज युवकांमधील संवेदना हरवल्या आहेत. रिलेशनशीप संपत चालली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळामुळे माणसा-माणसातील नाती संपत चालली आहे. बाप सोडला तर सगळयाच नात्यांना अंकल, अंटी या शब्दावर भर आहे. कझीन मध्ये नाते कळत नाहीत कम्युनिकेशन कमी झाले आहे. प्लॅन तयार करून घेऊन पुढचे शिकावे. हे आजच्या तरूण पिढीला रासेयोच्या माध्यमातून सांगावे. 'भगवद्गीता', 'कुराण', 'बायबल', गौतम बुध्दांच्या जातककथा यामध्ये ऐकायला सांगितले आहे. ऐकण्यामुळे युवकांचे, समाजाचे कल्याण होत असते. 'सहिष्णुता' न ऐकल्यामुळेच धोक्यात येते. जेम्सलेनचे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल कांहीतरी लिहिले म्हणून पुण्याच्या युवकांनी भांडारकर संस्था फोडली आणि जेम्सलेनचे लिखाण पुसून टाकले. 'द ग्रेट सोल' मध्ये महात्मा गांधीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्यात आले आहेत. आज वैचारिक विचारांचा कोणीही विचार करीत नाही.

एनसीईआरटीच्या पुस्तकात पंडीत नेहरू व डॉ. आंबेडकर यांच्या चरित्राबद्दल वाद झाला. राम गणेश गडकरी यांनी लिहिलेल्या संभाजीच्या पुस्तकाबद्दल वाद झाला. (कम्युनिकेटीव्ह) संभाषण कौशल्ये, आत्मविश्वास युवकांमध्ये वाढवावे. संवाद कौशल्याबद्दल सामाजिक विचारवंत रूसो म्हणतात की ,''जे विचार आहेत मला व दुसऱ्याला मांडण्याचा अधिकार आहे आणि मला व दुसऱ्याला खोडण्याचा अधिकार आहे.''

2014 च्या पॉलिसीने युथ जबाबदाऱ्या दिल्या आहेत. 1) राष्ट्रीय एकात्मता - क्रांतीकारकांनी दिलेले बलिदान आज पातळ कमी होत चाललं आहे. स्वातंत्र्यलढयासाठीच्या त्यागाची आठवण युवकांना रासेयोच्या माध्यमातून करून द्यावे. छत्रपती शिवाजी महाराज हे ग्रेट रोज होते. उद्योग, व्यवस्थापन, सर्वधर्मसमभाव, आरमार, कृषीव्यवस्थेला सहकार्य करणारे राजे होते. त्यांनी पुरंदरचा तह सोडला तर सर्व लढे जिंकले आहेत. अष्टप्रधान कसे होते. हे सर्व कौशल्ये त्यांच्याकडे लहान पणापासून होते. म्हणून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अंगी असलेले गुण युवकांना सांगावेत. फुटकळ शिवाजीमहाराजांचा इतिहास तेवढा आजच्या युवकांना सांगितला जातो. राजगुरू, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची राष्ट्रभक्ती युवकांना सांगण्याची गरज आहे. असे म्हटले जाते की, ''जेंव्हा इतिहास लयाला जातो तेंव्हा राष्ट्र लयाला जातो. म्हणून देशाचा खरा-खुरा इतिहास युवकांना सांगावा.''

आर्थिक स्वयंपूर्णता पौर्वात्य जगात लॉग व्यवसायाच नाही मी काय काम करू शकतो हे सांगण्यास लाजायचे नाही. आर्थिक परावलंबी राहिलं की, स्वावलंबी बनत नाही. श्रमप्रतिष्ठा वाढली की, अर्थव्यवस्था वाढते. तृतीयपंथी लोक टाळया फक्त बाजार मागण्याच्या वेळी वाजवतात. त्यांच्याविषयी समाजात चांगली भावना असावी त्यांच्याविषयी स्त्री-पुरूषांनी आदर बाळगावा. सहिष्णुता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. निर्बुध्द, पोकळपणा म्हणजे युवक असे म्हणणे चुकीचे आहे. पर्यावरण जागृतता करणे आवश्यक आहे. ''झाडं तोडा व होळी पेटवा.'' असे कुठेही शिकवले नाही. आज आपण पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास करतो आहोत. महाराष्ट्र शासनाने जलसंपदा विभागाच्या द्वारे जी जलप्रतिज्ञा सांगितली आहे ती ग्रामीण भागातील समाजाला रासेयोच्या माध्यमातून सांगावे ती जलप्रतिज्ञा अशी -

''मी प्रतिज्ञा करतो की, पाणी हे जीवन असून, त्याचा वापर गरजेपुरता व काटकसरीने करेन. मी पाण्याचा अपव्यय व गैरवापर करणार नाही. नैसर्गिक प्रवाह, जलाशय, कालवे व पाणी पुरवठयाच्या पायाभूत सुविधांचे मी रक्षण करेन पाण्याविषयीचे कायदे व नियमांचे काटेकोरपणे पालन करीन. पाण्याचे संवर्धन व जतन करण्याचा मी प्रयत्न करेन. पाण्याची स्वच्छता व पावित्र्य जपणे, ही माझी सामाजिक जबाबदारी सदैव पालन करीन जय हिंद ...'' अशी प्रतिज्ञा रासेयो स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील व शहरातील समाजाला द्यावे. मागच्याच तीन वर्षाखाली मराठवाडयातील लातूर जिल्ह्याला रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला. एवढा प्रचंड दुष्काळ पडला होता. हे विसरून चालणार नाही. पर्यावरण हे एक मूल्य आहे. त्याची जोपासना करून विकास करण्यासाठी आवश्यकता युवकांना पटवून द्यावे. भविष्यात पाण्यासाठीच तिसरे महायुध्द होऊ शकेल म्हणून जलजागृती सप्ताह साजरा करण्याची आवश्यकता आहे.

महिला सबलीकरण व सक्षमीकरण स्त्रिया खरोखरच मुक्त झाल्या आहेत का? हा मुद्दा अगोदर फार महत्वाचा आहे. मुक्त न झालेल्या स्त्रियांचे सबलीकरण करण्याचे ढोंग आपण करतो आहोत. अधिकार व कर्तव्याची जाणीव असायला हवी. आई-वडिलांना सांभाळण्याचे कर्तव्य मुलगा व मुलगी दोघांचेही आहे. असा निकाल न्यायालयाने दिला आहे. आई वडिलांच्या मालमत्तेची समान विभागणी होणे आवश्यक आहे. न्यूनगंड काढून टाकावा, स्वतःबद्दल आदर असावा, व्यसन मुक्तीवर बोलावे. राज्य चालवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली. तर आजचे राजकारणी लोकांची मानसिकता लुटून राज्य चालवत आहेत. 'समाजस्वातंत्र्य' हे मासिक रघुनाथ धोंडो केशव कर्वे यांचे आहे. त्यांचे कार्य युवकांना सांगावे सेक्सवर अगोदर बोललो तर एड्सवर बोलण्याची गरज नाही. कारण जे अनैतिक आहे, वाईट आहे त्याच्या मुळावर प्रथम घाव घालावा लागतो चौथ्या घोडयासारखी मेडिया उधळत आहे. त्यांना लगाम घालणं आवश्यक आहे. दुरदर्शन वरील मालिकामुळे स्त्रिया तल्लख झाल्या आहेत. हायपोथिसेस वाढला आहे. मालिकांमधील नायिकाप्रमाणे स्त्रिया केस, मंगळसूत्र, कपडे बदलत आहेत. भावना सुध्दा दाबून टाकतो आहोत. जिथे विनोद घडला तिथे मोठयाने हसले पाहिजे. युवकांना चित्रपटांचे खुप आकर्षण असते. सर्व चित्रपट युवकांना वास्तवतेपासून बारा कोस दुर घेऊन जात आहेत. स्वामी विवेकानंद म्हणतात की, ''शारीरिक क्षमता, बौध्दिक सबलता, सामाजिक भान, राजकीय भान, अध्यात्मिक भान प्रबळ असणारे युवकच राष्ट्र प्रबळ व बळकट करू शकतात.'' हे सर्व रोसेयोच्या विविध कार्यक्रमामधून युवकांना सांगण्याची गरज आहे म्हणून असे म्टले जाते की, ''जो दुसऱ्यांना तारूण तिरापलीकडे नेऊन सोडतो तोच तरूण असतो.'' तसेच याच दिवशी डॉ. शंकर थोपटे सरांचे ''फार्मर वॉटर सप्लाय'' (A New Pollutation) या विषयावर सखोल असे मार्गदर्शन झाले.

24 फेब्रुवारी 2018 रोजी सकाळच्या पहिल्या सत्रात रासेयो समन्वयक डॉ. शरद बोरूडे सरांनी ''रासेयो संबंधी माहिती व वार्षिक नियोजन'' कसे करावे या विषयावर मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयात वर्षभरात आपण रासेयो कार्यक्रमाचे नियोजन व वेळापत्रक कसे तयार करतो हे A-7-B-7-C-7 असे तीन ग्रुप तयार करून प्रत्यक्षात नियोजन करून ग्रुप लिडरला मांडण्यास सांगितले. त्यामधील लागणारे तास किती आणि त्यातील चुकांची दुरूस्ती करून सांगितलेली आहे. याचा फायदा असा की, आपण राबवत असलेल्या कार्यक्रमांना एक प्रकारची शिस्त लागते तर सकाळच्या दुसऱ्या सत्रात डॉ. भालसिंग दिलीपकुमार यांनी या “Youth Health” विषयावर खुप सुंदर असे विचार व्यक्त केले. 2014 ते 2016 या काळात 26000 युवकांचा मृत्यू वेगवेगळया कारणामुळे झाला आहे. विना परवाना गाडी चालवणे, व्यसनाच्या आहारी जाणे, मोबाईल फोनचा अनावश्यक वापर करणे, सेक्सच्या आहारी जाणे, फिजीकल थिंगस, गॅझेटमधील वृत्ते ते वाचणे मनावर घेणे, डिप्रेशन, इटिंग, ऑप्शनल डेफिक्ट ड्रायव्हींग, चरस, गांजा, दारू, सिगारेट, गुटखा या व्यवसनांच्या आहारी जाऊन तरूण पिढी बरबाद होत आहे. 18 व्या वर्षी एड्स झला की, 26 व्या वर्षी युवक मरतात. चंगळवाद, भोगवाद, भौतिकवाद, वाढल्यामुळे तरूणांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. आज पैशासाठी लोक नको त्या स्तराला पोहचत आहेत. सरोगेट सारख्या प्रकारातून पैसे उकळत आहेत. या सर्व समस्यामुळे युवक शारीरिक दृष्टया कमकुवत होऊन अनेक आजारांना, रोगांना बळी पडत आहेत. त्यातून युवकांच्या मृत्यूचे प्रमाण 2016 ला 9474 तर 2017 पासून 2438 एवढे वाढलेले आहे. या समस्यांच्या भस्मासूराविरोधात युवकामध्ये जनजागृत रासेयोच्या माध्यमातून करण्याची आवश्यकता आहे. हेच युवक भविष्यातील राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. तर दुपारच्या सत्रामध्ये डॉ. कणुजिया सरांनी ''सोसेल हार्मोनि'' या विषयावर खुप सखोल असे मार्गदर्शन केले आणि योगा, प्राणायाम यांचे महत्व विशद केले.

25 फेब्रुवारी 2018 रोजी योगा, प्राणायाम, व्यायाम सकाळी 6.00 ते 8.00 वाजेपर्यंत मॅडम शिकवत असत. सकाळी 10.00 वाजता आमची सहल राळेगणसिध्दी, हिवरे बाजार, माऊली प्रतिष्ठान या स्थळांची पाहणी करण्यासाठी स्कूलबसने अहमदनगर कॉलेजहून अतिशय आनंदी वातावरणात निघाली. स्कूलबसमध्ये आम्ही सर्वजण प्राध्यापक आहोत हे राळेगणसिध्दी येईपर्यंत हिंदी, मराठी गाण्याच्या भेंडया खेळत, विद्यार्थ्यांसारखे चॉकलेट, चिप्स, खात-खात, जात होतो. गाव आले की मात्र शिस्तित प्राध्यापकासारखे वागायचे. असे आम्ही सर्वांनीच ठरवलो होतो. एवढी स्नेहभावना आमच्यामध्ये वाढली होती. विविध विद्यापीठातील, महाविद्यालयातील आम्ही असून सुध्दा एकाच परिवारातील वाटत होतो. राळेगणसिध्दीच्या शिवारात आमचा प्रवेश झाला. सर्वांनाच राळेगणसिध्दीस भेट देण्याचा मोह झालेला होता. नगर-पुणे राजमार्गावरील वाडेगव्हाण गावाजवळ असणाऱ्या पारनेर फाटयावरून दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो. पारनेरकडून उत्तरेस शिरूरला निघाले की, घनदाट वनराई डोळयाला दिसते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उंचउंच गगणाला भिडणारी वृक्षांची दाटी डोळयाला दिपवते. सर्वांच्या तोंडून एकच वाक्य बाहेर आले ते म्हणजे राळेगणसिध्दी आले वाटते असे हे राळेगणसिध्दी हे 2000 लोकवस्तीचे गाव पुणे-नगर राजमार्गावरील पारनेर फाटयापासून 05 किमी अंतरावर आहे. आमची स्कूल बस सरळ राळेगणसिध्दी गावात घुसून सरळ यादवबाबांच्या मंदिरासमोर जाऊन थांबली. आम्ही पायातील वाहन ठेवण्यासाठीसुध्दा तिथे लोखंडी स्टँड होते. कुठेही पर्यटकांनी खेटर सोडू नये. तर ते एका लाईनमध्ये शिस्तीत ठेवावेत म्हणून स्टँडची व्यवस्था केलेली प्रथमदर्शनी लक्षात आले. यावरूनच गाव किती स्वच्छ आणि सुंदर आहे. याची कल्पना आली. मंदिराच्या बाजूला खाकी पोशाखातील सुरक्षेसाठी पोलीस हातात काठया रायफल घेऊन आपले कर्तव्य पार पाडत होते. चारशे ते पाचशे मिलीमीटर होणारा पाऊस, दोन हजार लोकवस्ती असलेले गाव आज समृध्द आणि स्वावलंबी बनले आहे. एका काळात या गावातील लोकांच्या खाण्या-पिण्याचे वांदे होते लोकांच्या हाताला साधा रोजगार सुध्दा मिळत नव्हता. पोटाची खळगी भरण्यासाठी 70 टक्के लोक दुसऱ्या गावामध्ये जाऊन राहिले. जे गावात कांही उरलेले लोक गावातच राहिले. ते दारू-भट्टीचा व्यवसाय करून गुजरान करू लागले किमा 30 ते 35 दारूच्या भट्टया गावात राजरोसपणे चालत असत. दारूमुळे सगळा गावच व्यसनाधीन बनला होता. ''पिताडे आण वेडयाचं गाव'' असे म्हणून गावची बदनामी होत असे. 1965 च्या भारत-पाक युध्दात 11.12.1965 खेमकरण सीमेवर अण्णांच्या वाहन ताफ्यावर पाकिस्तानने हवाई हल्ले केले. या हल्ल्यात अण्णांचे सर्व सहकारी सैनिक शहीद झाले. अण्णा कपाळाला गोळीचा एक तुकडा लागून जखमी झाले. तेथील भीषण अवस्था पाहून अण्णा अस्वस्थ झाले. मी एकटाच जीवंत कसा राहिलो? यामागे कोणते कारण असावे? माझा हा पुर्नजन्मच झाला आहे. ही दैवी कृपा असली पाहिजे. असा विचार करत असतानाच तेच स्वामी विवेकानंदाच्या पुस्तकावरील चित्र समोर तरंगू लागलं. मानवसेवा हीच ईश्वरसेवा हे स्वामी विवेकानंदाचं वाक्य मनावर घिरटया घालू लागलं. पेरलेल्या संस्काररूपी बीजाला अंकूर फुटले आणि त्या युध्दभूमीवरच निर्णय झाला. मिळालेला पुनर्जन्म आता केवळ समाजसेवेसाठी, समाजाच्या कल्याणासाठीच असा ठाम निर्णय करून 1975 मध्ये परतले. समाजात असणारी गरीब माणसं, बडया सावकारांकडून त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार अण्णांना सहन होत

नव्हते. परंतु मातोश्री लक्ष्मीबाई यांच्या संस्कारशील, धीरोदात्त त्यागी वृत्तीने त्याच चटक्यांना थंडावा दिला होता. पुढे अण्णांनीही समाजातील पीडित, शोषित अन्यायग्रस्त समाजाचे मातृत्व स्वीकारले सुमारे 15 वर्षे देशरक्षणाचं महान कार्य करून 1975 ला त्यांनी समाजसेवेचा वसा घेतला. तो श्री संत यादवबाबांच्या मंदिराचा जिर्णोध्दार करून हेच यादवबाबांचं मंदिर पुढे राळेगण शिंदीचे राळेगणसिध्दीत रूपांतर करणारे लोककल्याणाचे केंद्र बनले. यादवबाबांच्या कृपाशिर्वादाने खऱ्या अर्थाने राळेगणला अण्णांच्या रूपाने सिध्दी प्राप्त झाली होती. पण विकासकामे थांबली नाहीत. ती चालूच आहेत. चालूच राहणार आहेत विविध अंगानी (बाळासाहेब वाघ, 'ग्रामविकासाची पाऊलवाट राळेगणसिध्दी' मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी, पृ.क्र.13 व 38) श्रमदान, नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी या पंचसूत्रीचा वापर करत गावाचे नंदनवन केले. आजपर्यंत जवळपास पाच लाखाहून अधिक देश विदेशातील लोकांनी राळेगणसिध्दीस भेट देऊन पाहणी केली आहे. त्यात आम्ही 21 जण होतो हे गाव पाहून, आनंद उपभोगून अक्षरशः डोळयाचे पारणेच फिटले आहे. सामाजिक कार्याचे भान असणाऱ्या लोकांनी राळेगण सिध्दीच्या विकासाची ज्योत आपापल्या गावी नेऊन प्रज्वलीत केली. तर सुमारे 17000 अधिकाऱ्यांनी येथील केंद्रात प्रशिक्षण घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील गावांना त्याचा लाभ मिळवनू दिला. त्यामुळे भारतभर राळेगणसिध्दीची एक आदर्श गाव म्हणून ओळख निर्माण झाली. राळेगणसिध्दीला भेट देण्याचा दुग्धशर्करा योग अहमदनगर कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने 139 ओरिएन्टेशन कोर्सच्या माध्यमातून जुळवून आणला. आमच्या अनुभवात प्रत्यक्ष पाहून भर पडली. यादवबाबांचे आम्ही सर्वांनीच दर्शन घेतलो आणि अण्णांना घर सोडून आज 35 वर्षे होत आली. आप्तजनांच्या माया, मोहपाशातून त्यांनी स्वतःची सोडवणूक करून घेतली असली तरी व्यापक समाजहिताच्या मोह, मायापाशात ते अडकलेच. यादवबाबांच्या समाधिशेजारी असणाऱ्या एका छोटया खोलीत राहून अखंड मानवजातीच्या उध्दाराचा विचार त्यांच्या मनात सातत्याने चालू असतो. ही खोली डोळयांनी पाहून डोळयांचे पारणच फिटले. येथून वारकरी संप्रदायाचे शेवटचे संत आणि संत तुकारामांचे शिष्य संत निळोबाराय यांच्या नावाने असलेली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज नऊशे विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. हे ऐकून व पाहून खुपच ऱ्हदय भरून आले. अण्णांनी विद्यार्थ्यांना मानवी जीवनाचं माणूसपण जगायला लावणारं शिक्षण मिळावं यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे. ''शिक्षा सफाई से शुरू होती है'' हे महात्मा गांधी यांचे तत्व स्वच्छता आणि आरोग्याचं महत्व लक्षात घेऊन राबवले जात आहे. त्यातून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे मिळत आहेत. अशी शाळा जर देशाच्या प्रत्येक गावात निर्माण झाली तर आपला देश खरेच महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही. हा आदर्श रासेयोच्या माध्यमातून आम्ही सर्वजण गावोगाव शिबिरातून राबवणार असा विडाच उचलून म्युझियमकडे (वास्तुसंग्रहालय) निघालो आणि आतमध्ये पोहोचताच डोळे दिपवून टाकणारे असे पुरस्कार व फोटो अण्णांच्या आहेत. तसेच त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा चित्रफीत तयार करून एलईडीवर दाखविली जाते तेही पाहण्यात आली. आज वयाच्या पंचाहत्तरीतही राज्यभरच नव्हे तर देशभरात जनजागृतीसाठी सुमारे सत्तर हजार किमीटरचा त्यागमय प्रवास सातत्याने कधीच आढेवेढे न घेता करत आहे. जनजागृतीचे काम अविरतपणे गांधीवादाच्या मार्गाने आणि स्वामी विवेकानंदाच्या प्रेरणेने आजही चालूच आहे. 23 मार्च 2018 या शहिद दिनापासून लोकपाल, लोकायुक्त, डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी आणि निवडणूक सुधारणा या तीन मुख्य मागण्यासाठी अण्णांनी आंदोलन सुरू केले होते. केंद्र सरकारने सर्व मागण्या मान्य केल्यामुळे अण्णांनी आपले उपोषण गुरूवारी सातव्या दिवसी मागे घेतले. केंद्र सरकारने लोकपाल आणि लोकायुक्तची नियुक्ती सहा महिन्यात केली नाही तर सप्टेंबरपासून पुन्हा रामलीला अशी धमकीवजा ताकीद दिली आहे. (दै. पुण्यनगरी लातूर, शुक्रवार, 30 मार्च 2018, पान क्र. 01 व 04) खरेच अण्णांच्या वयाचा विचार केला तर त्यांच्या धैर्यापुढे तरूणांना सुध्दा नतमस्तक व्हावे लागते. त्यांच्या आदर्श गाव निर्मितीच्या प्रकल्पामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणून ते अक्षय चिरपरिचित झाले आहेत व राहणार आहेत. अण्णांना वृक्षमित्र, पद्मश्री, पद्मभुषण, डॉक्टरेट असे अनेक पुरस्कार मिळाले पण सामान्य जनतेने बहाल केलेले जेष्ठ समाजसेवक हे बिरूद आत्यंतिक उच्च पातळीचे आहे. कारण ती सामान्य जनतेने दिलेली पदवी आहे. तसेच त्यांना महाराष्ट्रातील समाजशिक्षक, कृषीपुत्र, महानुभाव, दुसरे लालबहादूर शास्त्री अशाही पदव्या दिल्या तरी कमीच आहेत. त्यामुळेच देशातील स्वयंसेवी संस्था, नगरपालिका, महापालिका, राज्यसरकार, केंद्रसरकार एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरचे एकूण 200 मानसन्मान अण्णांना प्राप्त झाले आहेत. कृषीभुषण, प्रियदर्शनी, वृक्षमित्र, मॅन ऑफ द ईयर, आशिया मानव शक्तीचा स्वामी विवेकानंद, चेन्नई स्थित भगवान महावीर फाऊंडेशनचा महावीर ॲवार्ड, रोटरी मानवसेवा, वॉशिंग्टन स्थित केअर इंटरनॅशनल, दक्षिण कोरियाचा इंटरनॅशनल ट्रान्सपरन्सी, वॉशिंग्टन स्थित जागतिक बँकेचा जी गिल असे मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या समाजकार्याचा वटवृक्ष बहरून आलेला पाहून खरेच जीवनात धन्य झाल्यासारखे वाटले. येथून आम्ही स्कूलबसमध्ये बसलो आणि दुपारी 2.00 वाजण्याच्या सुमारास जेवणासाठी म्हणून गावाच्या कडेला खुप मोठे वडाचे जुने झाड आहे. तिथेसुध्दा स्वच्छता, सुंदरता दिसून आली. बांधलेल्या शौचालयाच्या सभोवतीसुध्दा दाट अशी वनराई

लावलेली आहे. त्याचबरोबर तिथे निवासाची व्यवस्था आहे. गांधीजींचा खुप मोठा पुतळा आहे. आम्ही वडाच्या झाडाखाली सावलीला बसून सर्वांनी पुरी भाजी, भात, शेवग्याच्या शेंगा मिसळलेले वरण अशा विविध पदार्थांच्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. सामूहिक फोटो घेतला. गावाच्या परिसरातील जलसंधारणाची कामे, विद्यालय, राष्ट्रीय पाणलोट, प्रशिक्षण केंद्र आदि कोटयावधी रूपयांची विकासकामे प्रत्यक्षात पाहण्यात आली. आदर्श गाव कसे असते, त्याचबरोबर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील आदर्श गाव, संत गाडगेबाबांनी सांगितलेले स्वच्छ गाव हे राळेगणसिध्दी पाहिल्यानंतर कळाले. अनेक तीर्थ करून जे समाधान लाभत नाही ते राळेगणसिध्दी पाहिल्यानंतर तीर्थयात्रा केल्याचा ब्रम्हानंदसहोदराचा आनंद मिळतो.

राळेगणसिध्दी हे आदर्श गाव पाहिल्यानंतर आमची सफर मा.श्री पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार हे गाव पाहण्यासाठी निघाली. राळेगणसिध्दी ते हिवरे बाजार या दोन गावातील अंतर आम्ही पुन्हा गाण्यांच्या भेंडया खेळत हसत खेळत कापत पूर्ण करत गेलो. हिवरे बाजार या गावचा परिसर अत्यंत निसर्गरम्य व स्वच्छ होता. गावाच्या तिन्ही बाजूंनी डोंगर कडयांचा सुपीक परिसर त्याचा सदुपयोग, पाणी अडविण्यासाठी होऊ शकतो या विचाराने हिवरे बाजार ग्रामस्थांनी डोंगराच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना जलशोषक चर खोदून डोंगरावरून वाया जाणारे पाणी गावाकडे आणून जमिनीत मुरवले आहे. गावाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी या दोन्ही गावांनी जलसंधारण विकास हा ग्रामविकासाचा आत्मा मानून पाणलोटची कामं केलेली आहेत. अशी दुरदृष्टी असणारे सरपंच महाराष्ट्रातील गावांमध्ये बोटावर मोजण्याइतकेच आहेत. सरपंच पोपटराव पवार म्हणजे हिवरे बाजार आणि हिवरे बाजार म्हणजे पोपटराव पवार असे समीकरण आहे. माणसावरून हिवरे बाजारची ओळख आहे. मला असे वाटते की, देशातील हजारो गावापैकी 28 वर्षे सलग बिनविरोध सरपंच निवडणारे हिवरे बाजार हे देशाच्या नकाशातील पहिले गाव असावे. आजच्या सर्वच ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांनी हिवरे बाजार व राळेगणसिध्दी ही दोन गावं रोल मॉडेल म्हणून पाहूनच निवडणूकीचा फॉर्म भरावा. हिवरे बाजार येथील पोपटराव पवार यांनी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पावलावर पाऊन ठेऊनच गावाचा विकास केला आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार केंद्रात व राज्यात असो निधी खेचून आणून गावाचा विकास करणे हेच ध्येय पोपटराव पवारांचे आहे. आमचे दुर्दैव असे की, अण्णा हजारे व पोपटराव पवार या दोन महापुरूषांची प्रत्यक्षात भेट झाली नाही. गावाच्या हितासाठीच राजस्थान मध्ये हे दोघेही त्यावेळी होते. पाणी हे जीवन आहे. त्याचा वापर योग्य पध्दतीने व्हावा. जे कांही उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन नियोजन केले तर पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी जलव्यवस्थापन कार्यक्रमावर यांचा भर आहे. हिवरे बाजार गावातील सर्व जाती धर्मातील माणसं गुण्यागोविंदाने व बंधुभावाने राहतात. उन्हाळयात शेतीला पाणी देत नाहीत. लोकांना पिण्यासाठी व वापरण्यासाठीचे पाणी शिल्लक ठेऊनच उरलेला पाणीसाठी शेतीसाठी वापरतात. अन्यथा शेतीला पाणी कोणीही उन्हाळयात देत नाही. आणखी एक वैशिष्टय म्हणजे कोणीही स्वतःच्या शेतीतही बोर घेत नाहीत. घ्यायचे तर ग्रामपंचायतची परवानगी घ्यावी लागते. या गावातील शिवारात विहीरींना भरपूर पाणी असते. गावाच्या कांही अंतरावर उंच डोंगराव अंबा देवीचे मंदिर आहे. तेथे तेवढया उंच डोंगरावर हापस्याला पाणी आहे. असे नियोजन प्रत्येक गावागावात झाले तर महाराष्ट्र निश्चितच आदर्श राज्य बनेल. गावातील लोकांची सरपंचाची साधी राहणी उच्च विचारसरणी दिसून आली. त्यांची ग्रामसंसद, ग्रामपंचायत ही विधान भवनाप्रमाणे आहे. गावातील रस्ते, स्वच्छ आणि तुप सांडले तर भरून घेण्यासारखे आहेत. कोणाच्याही घरासमोरून जाणारे नालीचे घाण पाणी सोडून उघडयावर सोडून दिलेल नाही. कचरा कुठेही टाकत नाहीत. डस्टबीन मध्ये कचरा टाकला जातो. प्रत्येकाच्या घरासमोरील अंगणात सडासंमार्जन केलेल होते. स्मार्ट सिटी कशी असते हे मला कांही ज्ञात नाही पण स्मार्ट गाव म्हणजे हिवरे बाजार पाहण्यात आले. एवढेच काय पण आम्ही गावाच्या बाहेरून फिरलो. कुठेही गाव सोडून बऱ्याच अंतरापर्यंत घाण केलेले किंवा कचरा टाकलेले आढळून आले नाही. नव्हे तर इतर गावांच्या हद्दीत प्रवेश केला की हागणदारीचे दर्शन होते. हागणदारी मुक्त खरे गाव म्हणजे हिवरे बाजार आहे. गावाच्या सभोवती कुठेही पदरातील शिदोरी सोडून जेवण करू शकतो. एवढी स्वच्छता हिवरे बाजार गावात आणि परिसरात दिसून आले. सरपंचाचे जे सहकारी होते ते त्यांची आम्ही प्रत्यक्ष भेट घेतली त्यांनी एखाद्या विद्वानाला लाजवेल असे मनोगत व्यक्त करून गावाच्या संपूर्ण माहितीचा चढता आलेख आमच्यासमोर ठेवला. तुम्ही आमच्या हिवरे बाजार या गावात कशासाठी येता. इथे पाहण्यासारखे विशेष काय आहे? असे प्रश्न करून आम्हांला थक्क करून सोडले. तुमच्या गावात जे आहे ते हिवरे बाजार या गावातही आहे. तुमच्या गावात जसा सरपंच आहे तसा तो इथेही आहे. नवीन असे आमच्या गावात कांही नाही. प्रत्येक सरपंचाला असे आदर्श गाव निर्माण करता येते. राजकारणात कोणत्याही पक्षाचे सरकार असो श्री पोपटराव पवार योजना आणतात आणि समाजाच्या कल्याणासाठीच अहोरात्र चंदनासारखे झिजतात. हे मात्र खरे आहे. असे तुमच्याही गावातील सरपंच करू शकतात. हे त्यांच्या मनाचा मोठेपणा आम्हांला लक्षात आला. न्युनगंड, अहंकार, द्वेष, मत्सर, भेदभाव, जातीभेद, धर्मभेद, पंथभेद या गावात कुठेच नाही. फक्त गावचा विकास हे ब्रीद सर्वांच्या मुखात आहे. राष्ट्रीय,

आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी आणि या गावातील सरपंचाला दिलेल्या भेटवस्तुंनी एक मोठा हॉल गच्च भरला आहे. पुरस्कार ठेवण्यासाठी सुध्दा जागा कमी पडत आहे. हिवरे बाजार व राळेगणसिध्दी हे दोन्ही गावं पर्यटनस्थळ किंवा तीर्थक्षेत्र बनलेली आहेत. एवढी गर्दी पाहण्यासाठी आहे. खरंच इथे कांही तरी घेण्यासारखं व भरपूर कांही शिकण्यासारखे आहे. आषाढी कार्तीकी पंढरीच्या वारीला आळंदी ते पंढरपूर एक महिना वारकरी भजन किर्तन प्रवचन करत उपवासाची तमा न बाळगता गोल, लांब, चौकोनी रिंगण खेळत, मुखात विठ्ठलाचे नामस्मरण घेत जातात. आणि गोपाळपुऱ्यापासून पांडुरंगाच्या मंदिरापर्यंत रांगेत चार-चार दिवस थांबून विठ्ठलाचे मुख पाहून व चरणावर डोकं ठेऊन दर्शन घेतल्यानंतर त्यांचा एक महिनाभराचा शीणभाग उतरतो आणि स्वर्ग सुध्दा ठेंगणा होतो एवढा आनंद वारकऱ्यांना होता. पंढरपुरला संतांनी भुतलावरील वैकुंठ समजले आहे. कारण अनेक तीर्थक्षेत्रांना गेलो तरी जे समाधान मिळत नाही ते एका चंद्रभागेच्या स्नानाने तृप्त होऊन आनंद होतो. ''आनंदाचे डोही आनंद तरंग'' या संत तुकारामांच्या अभंगाप्रमाणे आनंद सोहळा उपभोगता येतो. असेच राळेगणसिध्दी व हिवरे बाजार पाहिल्यानंतर समाधान मिळते.

हिवरे बाजारहून आम्ही परत मोठया आनंदाने गाण्यांच्या भेंडया खेळत 'माऊली सेवा प्रतिष्ठान' ला भेट देण्यासाठी आलो. माऊली सेवा प्रतिष्ठान हे अहमदनगर शिर्डी महामार्गावर अहमदनगरपासून शिर्डीकडे जाताना 20 किमी वर देहरे टोल नाक्याच्या पुढे एक किमी डाव्या बाजूला महामार्गावरच वाय एस साने इंद्रधनू प्रकल्प आहे. माऊली सेवा प्रतिष्ठानच्या गेटपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज, आनंद झळकत होता. पण गेटच्या मध्ये प्रवेश केल्याबरोबर तेथील दृश्य पाहून सर्वांचे चेहरे खर्रकन लगेच पांढरे ठक्क पडले. सर्वजण आम्ही धीर गंभीर झालो. गेटच्या आतील बाजूच्या गेस्ट रूममध्ये आम्ही थोडावेळ बसलो. तथील टीव्हीवरील चित्रफीत पाहून तर आमचे ऱ्हदय जड होऊन अंतःकरण गदगदून भरून आले. पाण्याचा प्रवाह थोपवल्यानंतर कोणीकडे तर जाण्यासाठी वाट शोधते तशी आमची अवस्था झाली. प्रा. डॉ. योजना मॅडम तर अक्षरशः रडू लागल्या. माणूस समाजात, पृथ्वीवर वावरताना माझ्यासारखा कोणी नाही म्हणून जो दगडासारखा वावरत आहे. त्यांनी माऊली सेवा प्रतिष्ठानला एकवेळा तरी पाहूनच घ्यावे. आपोआप माणूस जाग्यावर येइल. मग समजेल की, माणसातील भावना, नैतिकता, आचार, विचार कुठे नाहीसा झाला. माणूस निर्जीव यंत्रासारखा कसा वागत आहे. हे सारेच पाहिल्यानंतर लक्षात येते.

आज आपण 21 व्या शतकाच्या गप्पा मारतो. जग सुधारलं, यंत्रयुग आलं, जागतिकीकरण आलं संगणक, मोबाईल, इंटरनेट, फेसबुक, व्हॉटसअप, युटयूब या भौतिक सुविधा आल्यामुळे आपली सुधारणा झाली अशा वल्गना आपण करीत आहोत. पण माऊली सेवा प्रतिष्ठान पाहिल्यानंतर आपली किती प्रगती झाली हे लक्षात येते. तसे पाहिले तर महिलांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत. आता अत्याचार दुय्यम झालेत अत्याचारित माता भगिनींची जात, धर्म आधी विचारात घेतला जाऊ लागला. अत्याचारी जाती धर्माचा आहे याचा शोध घेऊन रणनीती आखायला सुरूवात झाली. माणसातला माणूस कधीच मरून गेला देशात 125 कोटी लोकसंख्या आहे. तरूणांचा देश म्हणजे भारत असे म्हटले जात आहे. पण मला वाटते की, यातले हाताला किती कोटी लागले हे महत्वाचे आहे. आपल्या देशातील तरूण पिढी कोणते कृत्य करत आहे. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. माऊली सेवा प्रतिष्ठानमधील परिस्थिती डोळयाने पाहिल्यानंतर आज आपण रानटी अवस्थेतच वावरत आहोत असे वाटते. आदिमानव तरी आजच्या प्रगत माणसापेक्षा चांगला होता. इथल्या आत्मकेंद्री समजात समतेचा संदेश देणाऱ्या तुकोबा, ज्ञानोबा, चोखोबा, सावता आणि तहानलेल्या गाढवाला गोदावरीच आपल्या कावडीतील पाणी पाजणाऱ्या एकनाथांचा फक्त उद्घोष आणि परस्त्री आम्हा रूक्मिणी मातेसमान ही संत तुकारामांची विचारसरणी चित्राचीही स्त्री न पहावी, ''तुमचेन योगी मुंगी रांड न व्हावी.'' हा महात्मा चक्रधरांचा विचार, महात्मा गौतम बुध्दांचे पंचशील सम्यक तत्वज्ञान, छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीवर सैनिकातील व्यक्तीने नजर टाकली म्हणून त्याचा चौरंगा केला होता. हे सगळे विचार व महामानव आपआपल्या जातीमध्ये आज विभागण्यात आले. पुरोगामीत्वाची परंपरा सांगणाऱ्या महाराष्ट्राने फुले, शाहू, आंबेडकर विचार व्यासपीठावर, भाषणात सांगता-सांगता संपवला. सगळीकडे असा भोगवाद, चंगळवाद, दहशतवाद, भौतिकवाद, कुत्र्याच्या छत्रीसारखा फोफावला आहे. सगळीकडे अंधार पसरला आहे. इथे माणसे का अनामिक विचारात स्वतःला वैचारिक दृष्टया संपवत आहेत? साधूसंताच्या या भूमीत इथे माणसामाणसात आता पक्या तटबंदी रचल्या जाऊ लागल्या आहेत. आपण पुन्हा अंधारयुगात, तमोयुगाच्या गप्पा तर मारत नाही? परंतु माऊलीच्या सध्याच्या इंद्रधनु प्रकल्पामध्ये रस्त्यावरून, निराधार, अत्याचारीत, निराश्रीत, मानसिक व शारीरिक आजारी स्त्रिया, रस्त्यावरून उचललेल्या मनोरूग्ण महिलांवर रस्त्यावरच झालेल्या अत्याचारामधून जन्माला येणाऱ्या बालकांचा, वेडसर पुरूष यांचे मायबाप म्हणजे डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सौ. सुचीता धामणे हे दांपत्य अहोरात्र अशा रूग्णांची निस्वार्थपणे सेवा करत आहेत. स्वतःच्या प्रपंचाचा त्याग करून 70 खाटांच्या क्षमतेत 105 महिला व 14 मुले यांची सेवा करत आहेत. आम्ही डॉ. सुचिता धामणे व डॉ. राजेंद्र धामणे यांच्याशी प्रत्यक्षात चर्चा करून सर्व माहिती घेतली आहे. ते म्हणाले की, इथली

माणसे मोठ-मोठी राहण्यासाठी घरे बनवतात. मग आपापल्या मानून घेतलेल्या जाती आणि धर्माप्रमाणे कुणी त्याला देऊ म्हणतात. कुणी मस्जिद, कुणी चर्च आणि हा सर्वसाक्षी सर्वांच्या साक्षीने त्या-त्या स्थळी निवासत असतो त्यांच्यासाठी घर बांधणारी मंडळी मग त्यांचे भलतेच कौड कौतुक करीत असतात. त्यांच्या नावाने कुणी उपास तापास करतात तर कुणी त्याला पंचपक्वानांचा नैवद्य ठेवतात. तो खात नाही हा भाग निराळा.

ईश्वरानेच निर्मिती केलेली कांही माणसे अन्नपाण्याविना तडफडतात. संविधानाने दिलेल्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत घटकांची पूर्तता व्हावी म्हणून ती दारोदारी भटकतात. रस्त्यावर तडफडून मरतात गटारीच्या वाहत्या घाणेरडया पाण्याने आपली तहान भागवतात. अन्नान्न दशा झालेली माणसं खर्जुल्या बेवारस कुत्र्यासाखं उकिरडयावरील घाणेरडं खात कधी मानवी जीवनाच्या सर्वोच्च अपमानाच्या क्षणी स्वतःची विष्ठाही खातात. हा जगत्नियंता सर्वशक्तीमान सर्वसाक्षी ईश्वर माणसाने निर्मिलेल्या त्याच्या महालात आत्यंतिक सुखोपभोग घेत त्या त्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करत असतो. हे खरंच असं खरं आहे? हा प्रश्न पडतो. देव धर्मांच्या आणि जाती-पातीच्या आणि आपापल्या जातींच्या आरत्या ओवाळत माणूसपणाची सर्व लाज आणि शरम खुंटीला अडकवून व्यवस्थेच्या नावाने बोंबा ठोकणारा, इथल्या संस्कृतीच्या ओव्या गाणारा आणि इथल्या संस्कृतीच्या आणि अध्यात्मिक परंपराच तोंड फुटेस्तोवर कौतुक करणारा माणूस खरंच या मोठ-मोठया घरात आणि स्वतःचं कोडकौतुक करून घेणाऱ्या सर्वशक्तीमान ईश्वराचीच निर्मिती असली पाहिजे? ईश्वर माणसातच असतो हे आपण सोयीस्करपणे विसरून गेलो. संतांनी देव देवळात नसून माणसांच्या ऱ्हदयात आहे. ''जेथे जीव तेथे शिव'' असे सांगितले आहे. पण आपण या माणसालाच पायदळी तुडवत आाहोत. या जगात माणूसपण हेच खरे आणि तेच माणसाला जागवते आणि जगवते. 'करूणा' या महिलेची कहाणी आपण समजून घेतलो तर लक्षात येते. माणूस बनण्याचा माऊलींच्या पोरांनी दिलेला धडा देव बनण्यांच आणि या भूमीला देव भूमी बनवण्याचं स्वप्न बाळगणाऱ्यांनी मुळातून समजून घ्यायला हवे. डॉ. राजेंद्र धामणे जीवंतपणी मानवी देहांची सडलेली आणि कुजलेली जखम आणि त्याची दुर्गंधी अनुभवत आहेत. करूणावर उपचार करून एकंदरीतच मानवी आयुष्याचा भयाण वास्तवपट डॉ. धामणे दांपत्यानी आमच्यासमोर उभा केला. या जगात कितीही दुःखे असली आणि माणसं कितीही आत्मकेंद्री अमानवी वागली तरी माणसातील माणूसपण जिवंत आहे. तोपर्यंत या नकारात्मक न संपणाऱ्या लढाईत मानवता पणाला लागेल पण ती जिंकेल. परमेश्वराने मला तुमच्या कुशीत जगवण्यासाठी आणुन सोडले. डॉ. धामणे यांना ती परमेश्वरच मानते. डॉ. सुचेता धामणे पुढे म्हणाल्या की, यंत्रणा आणि इथली स्वमग्न मने सोडली म्हणून आपल्याला हात वर करून ही जबाबदारी दुसऱ्या कुणावर ढकलता येणार नाही. या माणसांना माणूस म्हणून सन्मानाचं जीवन जगू देणं आणि किमान सन्मानाने या अभागी जगातून या बिनचेहऱ्यांच्या दुनियेतून इथल्या प्रागतिक, पुरोगामी, अध्यात्मिक आणि उन्नतविचार व संस्कृतीची भलावण करत जगणाऱ्या माणसांच्या दुनिययेतून शांतपणे अज्ञाताच्या प्रवासाला जाऊ देणं इतकं तर आपल्या हातात आहे असे म्हणाले. हे सर्व ऐकून आमचे मन खिन्न व उदास झाले. आणि वाटू लागले की, आपण प्रपंच, मुलं, बायको म्हणून किती गुंतलो आहोत. या डॉक्टरांना कितीतरी युध्दाचा प्रसंग रोज करावा लागतो याचे आश्चर्य वाटू लागले. आपल्याला चार माणसाचे कुटुंब सांभाळताना नाकी नऊ येतात यांनी चक्क 14 मुलांना स्वतःचे नाव देऊन पालन पोषण, शिक्षण त्यांची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारली आहे. यांच्यासारखे मला वाटत नाही जगात दुसरे मोठे कार्य आहे. आम्ही अनेक दुरूस्त झालेल्या महिलांशी संवाद साधला तर त्यातली एक महिला पीएच.डी., नेट-सेट होती कवितासुध्दा करत होती. आम्हांला तीने प्रत्यक्ष एक कविता म्हणून दाखवली. तर दुसरी महिला एम.एस्सी पर्यंत शिक्षण घेतलेली आहे. परंतु समाजव्यवस्थेच्या अनैतिकच्या बळी ठरलेल्या, अकाली वेडेपणा आलेल्या स्त्रिया, अनैतिक संबंधातून जन्मला आलेली मुलं, माणूस म्हणून ओळख हरवलेली, या देशाचे नागरिकत्व काय असते हेही त्या विसरलेल्या येथील समाज आणि यंत्रणाही सोयीस्करपणे या गोष्टी विसरलेल्या असताना त्यांना माणूस म्हणून आणि या देशाचे नागरिक म्हणून ओळख देण्याचे कार्य माऊली मध्ये नुकतेच झाले. अहमदनगरचे जिल्हाधिकारी मा. अनिलजी कवडे साहेब यांच्या पुढाकाराने माऊलीतील 100 महिला व 14 मुलांना नुकतेच आधार कार्ड चे वितरण करण्यात आले. यापैकी बहुतेकांना येथेच नविन नाव देण्यात आले. धामणे या आडनावाने त्यांची नवी ओळख निर्माण करण्यात आली. (माऊली वृत्त, माऊली सेवा प्रतिष्ठान) या स्त्रियांचे कुटुंब जरी सापडले तरीही त्यांना स्वीकारण्याची कुणाचीही तयारी नसते. कुटुंबमिलन यशस्वी होत नाही. म्हणूनच त्यांना त्यांच्या या हक्काच्या घरामध्येच कायमस्वरूपी ठेऊन त्यांचे पुर्नवसन करत त्यांना सक्षम बनविणे हेच डॉ. धामणे दांपत्याचे अंतिम ध्येय आहे. अगरबत्ती प्रकल्पामधून गोधडी शिवण्यामधून काही निधी या कामासाठी केला जातो. परंतु तो अत्यंत तोकडा आहे. त्यामुळे देणगीदारांच्या मदतीवरच अधिक भिस्त आहे. सध्याचा मासिक खर्च सुमारे 4.50 लाखापर्यंत आहे. हे सर्व पाहून आम्ही 21 जणांनी फुल नाही फुलाची पाकळी या नात्याने कोण हजार, कोणी पाचशे असे 13 ते 14 हजारांची मदतही केली. हे काही आमचे फार मोठे कार्य नाही. मला यातून एवढेच तळमळीने नम्रपणे विनंती करावी वाटते की, अशा

ठिकाणी सर्व राज्यातून मदतीचा हातभार लावला तर नक्कीच माणसात परमेश्वर शोधल्याचे सुख लाभेल. कांही असो डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचिता धामणे यांचे कार्य महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबा आमटे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार समाजोपयोगी आहे. त्यांच्या या कार्याला परमेश्वर शक्ती व बळ देऊन त्यांचं हाती धरलेले कार्य सफल होवो अशी हार्दिक शुभेच्छा देऊन मी त्यांना सलाम करतो. अशा गंभीर परिस्थिती आम्ही कांहीच एकमेकांना बोलता सरळ पाच नंबरच्या मुलांच्या वस्तीगृहात अहमदनगर कॉलेजमध्ये आलो.

26 फेब्रुवारी 2018 रोजी या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून दररोज योगासाठी सकाळी 6.00 ते 7.00 या वेळेत ठरल्याप्रमाणे योगासाठी वस्तीगृहाच्या समोरील मैदानात व्यायामाचे प्रशिक्षण घेण्यात आले. ज्यांना कांही आरोग्याच्या समस्या असतील. तर त्यांनी योगा शिकवणाऱ्या मॅडमच्या मार्गदर्शनाने आम्ही व्यायाम करायचो सकाळी 8.15 ते 9.00 पर्यंत सर्वजण ठरलेल्या वेळात ब्रेकफास्ट करून राष्ट्रीय सेवायोजना विभागातील सेमिनार हॉलमध्ये जाऊन वेळेवर उपस्थित राहायचो. पहिल्यांदा वर्गात गेल्यानंतर आमची दैनंदिनी ''हम सब मिलकर देश का अपने जग में नाम जगायेंगे। एन.एस.एस. का परछम लेकर आगे बढते जायेंगे।।'' हे एन.एस.एस. गीत सामूहिक गाऊनच सुरूवात झाली. सकाळच्या बौध्दिक कार्यक्रमाला सुरूवात झाली. डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांनी "Life Skill" या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले. ब्रेकफास्ट झाल्यानंतर रासेयो विभागाचे समन्वयक डॉ. अभय शालीग्राम यांच्या सकाळच्या 11.30 वाजताच्या दुसऱ्या सत्राला सुरूवात झाली. ''कार्यक्रमाधिकाऱ्यांचा रोल व जबाबदारी'' या विषयावर सरांनी बोलायला सुरूवात केली. सर म्हणाले की, रासेयोतून आपण काय शिकलो असा प्रश्न आपल्याला पडणे साहजिकच आहे. तर कुऱ्हाड, कुदळ, सबल, विळा, खुरपं, फावडं, टिकाव चालवता येत नव्हतं ते आम्ही शिकलो हे एकमेव उत्तर नाही. तर विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, विकसित करणे हे रासेयोतून घडले पाहिजे. 60 टक्के स्वयंसेवकांचे ओरिएन्टेशन (उद्‌बोधन) डेव्हलपमेंट (विकास) व्हावे आणि फक्त 40 टक्के श्रमदान आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे हे रासेयोचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रासेयोचे बोधावाक्य व चिन्ह "NOT ME BUT YOU" माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी आहे. हे आपणाला लोकशाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देते. निस्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. त्यामुळे स्वयंसेवकात समाजाभिमुख वर्तन निर्माण करणे हे कार्यक्रमाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. मला स्वतःसाठी नाही तर समाजासाठी काम करायचे आहे. सतत आपण दुसऱ्यांचा विचार करावा मानवप्राण्यांबद्दल सहानुभूती ठेवली पाहिजे. व्यक्तिगत कल्याणामधून समाजाचे कल्याण होते. रात्रंदिवस 24 तास स्वयंसेवकांना राष्ट्रसेवेसाठी तत्पर ठेवणे आवश्यक आहे. स्वयंसेवकाच्या छातीवर जो रासेयोचा बिल्ला लावला जातो. बिल्ल्याच्या मध्यभागी चाक असून त्या चाकात आठ आरे आहेत ते अष्टौप्रहर प्रतिनिधित्व करतात. या बिल्ल्याधील निळा रंग आकाशासारखा आहे. आकाश जसे विशाल आहे त्याप्रमाणे कामाला लिमिट मर्यादा नाही. या बिल्ल्यातला दुसरा जो लालरंग आहे तो तरूणांच्या उसळत्या रक्ताचे प्रतिक आहे. त्यातून कामात उत्साह, जोम किंवा जोश प्रतित होतो म्हणजे लाल रंग हा कामाच्या बाबतीत अग्रेसिव आक्रमक आहे. कार्यक्रमाधिकाऱ्यांचा रोल हा स्वयंसेवकांना घडविणे हा आहे.

प्राचार्याकडून 03 वर्षाचे कार्यक्रमाधिकारी नेमणुकीचे पत्र प्रथम घेऊनच पुढील कामाला सुरूवात करावे. रासेयो कार्यक्रमाधिकारी म्हणून विद्यापीठाकडून मान्यता घ्यावी. रासेयो विभागात एक डेडस्टॉक रजिस्टर असावे. जो कांही रासेयोला पैसा येतो त्यावर प्राचार्य व संस्थाचालकांचा हक्क नाही. दहा हजार रूपयापर्यंत खरेदी करता येते. स्टॉक रजिस्टरमध्ये इन्क्रायमेंट ऑल पाहिजे. जे सर्व्हिसेबल आहे. ते स्टॉक रजिस्टरमध्ये लिहावे. तर अनसर्व्हिसेबल आहे तेही डेडस्टॉक रजिसटरमध्ये लिहावे. (कुऱ्हाड, कुदळ, टिकाव, दांडे, फावडं, टोपलं, खुरपं, विळा) महाविद्यालयाला जर एखादे वेळी कांही साहित्य द्यायचे असेल तर त्याची नोंद करून पोचपावती (रिसिव्हड) घ्यावे. पुढच्या वर्षापासून पी.एफ. एम. एस. नविन येणार आहे. सर्व ऑडीट ऑनलाईन होणार आहे. व्हाऊचर पध्दती पुढील वर्षापासून बंद होणार आहे. कमीत कमी पाच व्हाऊचर बनवायचे आहेत. 13 घटक आहेत त्यातले तीन घटक महत्वाचे आहेत. मेकर कार्यक्रमाधिकारी चेकर प्राचार्य राहणार आहेत. पासवर्ड युजरनेम याला महत्व राहणार आहे. हरवलेल्या वस्तू नो मिसिंग आर्टिकल्स, म्हणून लिहायचे आहे. दुसरी वस्तू आणून परत करता येते. मिटींग घेऊन एक ठराव तयार करून पुढील कार्यवाही करावे. एक नियमित साठी व दुसरी निवासी वार्षिक विशेष शिबिरासाठी बैठक घ्यावे. दहाच्या वर सभासद समितीत नसावेत दोन विद्यार्थी प्रतिनिधी निवडता येतात. एक मुलगा व एक मुलगी नेमायचे असते. नियमित कार्यक्रम प्राचार्याकडून मंजूर करून घ्यावेत. सहकार्यक्रमाधिकारी कार्यक्रमाधिकऱ्यांचे इच्छेनुसार नेमण्याचा अधिकार असतो. सामाजिक कार्यात आवड असणाऱ्यांनाच नेमावे. वैयक्तिक कोणाचेही काम रासेयो विभागाने करायचे नाहीत. फक्त ग्रामपंचायतच्या सार्वजनिक जागेतच कामं करावेत. कनिष्ठ महाविद्यालयाचे रासेयो विभागाचे वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न असेल तर एकत्र वार्षिक शिबिर घ्यावे असे कांही नाही. जर त्यांचे सहकार्य शिस्त असेल तरच सोबत

घ्यावे. कारण आपण खेडेगावात शिबिर घेणार आहोत आपल्याकडे पाहणारे अनेकजण असतात. त्याचे भान कार्यक्रमाधिकाऱ्याने ठेवावे. ''चारित्र्य शिलम परम भुषणम'' याला रासेयोत खुप महत्व आहे. हे आपले सौभाग्य आहे. जे जतन करणे आवश्यक असते. तर समाजात, विद्यार्थ्यांमध्ये आपल्याला किंमत असते. नको त्याची मैत्री करणे चुकीचे असते.

ज्या गावात आपल्याला शिबिर घ्यायचे आहे तेथील सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांची अगोदर मिटींग (बैठक) घेऊनच शिबिराची तारीख निश्चित करावे. गावकऱ्यांच्या मनात नसेल तर त्यांनी आग्रह करण्याची आवश्यकता नाही. कारण गावातील समन्वय फार आवश्यक असतो. त्या गावात आपल्याला काय काम करता येईल याचे नियोजन करावे. सात दिवसाचे नियोजन करूनच काम करावे. लोकामध्ये जागरूकता निर्माण करून स्वच्छतेसाठी लोकांना प्रवृत्त करावे . 60 टक्के शौचालय असतील तर आपल्याला 40 टक्के शौचालयासाठी गावकऱ्यांचे सहकार्य घेऊन काम करावे. तिसरी बैठक घ्यायचे तर घेता येते. ज्या कार्यक्रमाधिकाऱ्यांचे तीन वर्षे रासेयोचे कार्य पूर्ण झाले असेल तर प्राचार्याकडून एक पत्र घ्यावे. नियमित आणि वार्षिक कार्यक्रमाच्या वेगवेगळया फाईल करावेत. 15 फाईल नियमित कार्यक्रमासाठी लागतात. नियमित फाईलसाठी 15 गुण तर वार्षिक शिबिराच्या फाईलसाठी 50 गुण आहेत. सामाजिक कार्यासाठी 50 गुण आहेत. शाळेचा सर्वे करून स्वयंसेवकांना शिकवणी तास घेण्यास लावणे. स्वच्छतेच्या अगोदरचा व नंतरचा फोटो घ्यावा. ॲक्शन फोटो असाव्यात स्वयंसेवकाकडून अहवाल व रिपोर्ट तयार करून घ्यावे अकरा दिवसाचे ट्रेनिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव व प्रमाणपत्र जिल्हाधिकारी ऑफिसला नोंदवायचे आहे. उत्कर्ष, युथ फेस्टिव्हल, सांस्कृतिक विविध गुणदर्शनसाठी (कल्चरल ॲक्टीव्हीटी) गोव्याला पाठवता येते. येथे कार्यक्रमाधिकारी लिडर म्हणून जाऊ शकतो.एस.आर.डी.एन. आरडी.एन.आय.सी. साठी महाराष्ट्र गोवा कर्नाटक झोनला जाता येते. तेथून नॅशनल लेवलला जाता येते. आय.ई.पी.मध्ये 20 जणांची टीम असते. श्रीलंका, जपान, मॅनमार, चायना या देशात स्वयंसेवकांना पाठवता येते. लिडरशीप करता येते हे सर्व स्वयंसेवकापर्यंत पोचवण्याचे काम कार्यक्रमाधिकाऱ्यांचे आहेत.

27 फेब्रुवारी 2018 रोजी योगा, नाष्टा झाल्यानंतर सकाळी 9.00 वाजता सेमिनार हॉलमध्ये उपस्थित एन.एस.एस. गीताने दिवसाचा शुभारंभ झाला. सकाळच्या सत्रात डॉ. डी. बी. मोरे यांचे "Development of ledearship Concept" या विषयावर सखोल असे मार्गदर्शन झाले यामध्ये Important management function leaders - influence process to accomplish mission inspiring commitments inproving organization, ledearship styles, Autocratic styule, laissez faire style (You) (No Leadership) Democratic style (We) Functions of Ledearship, qualities of leader, Leader - Encouranging - Focused - Strategic - Committed - Honest - strong Anna Hazare (Social Leader of India) we style इत्यादी घटक कार्यक्रमाधिकाऱ्याकडे असावेत याविषयी खुपच छान मार्गदर्शन करून पोपटराव पवार यांनी वैयक्तीक शैलीतून सामाजिक लिडरशीप केली. तसेच महेंद्रसिंग धोनी, इंदिरा गांधी यांची स्वतःची एक स्टाईल कशी लिडरशीप करण्याची आहे याचा आदर्श समाजाने घेण्याची आवश्यकता आहे. तसेच डॉ. कोल्हे आर.जी. यांनी Account and Record keeping In NSS या विषयावर मार्गदर्शन केले तर डॉ. शरद बोरूडे यांनी माहितीचा अधिकार 2005 या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले. अनेक माहित नसलेले कायदे माहित झाले. कोणत्या वेळी घटना घडलेल्या प्रसंगी माहितीचा अधिकार वापरावा व अपिल करावे याविषयी सविस्तर अशी आम्हांला माहिती दिली.

याच दिवशी दुपारच्या सत्रात डॉ. अभय शाली ग्राम सरांनी वार्षिक विशेष शिबिर (स्पेशल कॅम्प) यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले श्रमप्रतिष्ठा निर्माण करणे ही काळाची गरज आहे खेडयातील व शहरातील श्रम कसे करावे व श्रम काय असते हे त्यांना माहित आहे. श्रम हे नंतर प्रतिष्ठा वाटते बाहय कलाप्रकाराला रासेयोत खुप महत्व आहे. (एक्स्ट्रा ॲक्टीव्हीटी) कार्यक्रमाधिकाऱ्याने स्वयंसेवकांना कॅम्प घेताना फक्त मार्गदर्शन करायचे असते स्वयंसेवकामध्ये क्रिएटिव्हीटी असते ती वाढवून विकसीत करण्याचे कार्य करावे सुप्त गुणांचा विकास करणे हे कार्य करावे. डोळयांना न दिसणाऱ्या गोष्टीची संकल्पना तयार करणे म्हणजे क्रिएटीव्हीटी होय. उदा. तानाजी मालुसरे कोंढाणा किल्ला सर करताना आमावस्येची अंधारी रात्र होती. डोळयात बोट घालायला सुध्दा दिसत नव्हतं. पण न दिसणारी संकल्पना शोधणं हे रासेयोचे कार्य आहे. सांस्कृतिक विविध गुणदर्शन कार्यक्रमातून ग्रामस्थांशी स्नेह, जिव्हाळा अधिक वाढत असतो. गावातील निरक्षर, प्रौढ माणसांचा सर्वे करून स्वयंसेवकांना सुसंवाद साधण्यास सांगावे. प्रौढांना कसे शिक्षण द्यायचे याचे फक्त पंधरा मिनीटांचे ट्रेनिंग द्यावे या स्टेप्स लक्षात ठेवाव्यात. या स्टेप्स ऑफ कॅंप म्हणतात. एखाद्या मुलाला अचानक काम करताना एखादी जखम होऊन रक्त वाहत असेल तर बर्फ, तेल, हळद लावावे. हात मोडला लाकडी पट्टया लाऊन हात बांधता येतो. स्वयंसेवकांमध्ये कौशल्य विकास करणे आवश्यक आहे. डिस्कसेन मेकिंग स्कील जिद्द निर्माण करणे, तडजोड करण्यास शिकवणे स्वयंसेवकांना परिपूर्ण असा सामाजिक लायक नागरिक बनविणे आवश्यक आहे. स्पेशल कॅंपमुळे जबाबदारी स्वीकारण्याचे बळ येते. स्वतःला ओळखण्याची क्षमता निर्माण रासेयोमुळे होते. स्वयंसेवकांना संधी देण्याचे काम रासेयोतून करावे रोल बिल्डींग, हेल्थ कॅंप, अडल्ट एज्युकेशन युनिट,

क्लिनींग अव्हेअरनेस, कौन्सलिंग, द कम्युनिटी ऑन द रिव्हयूज प्रॉब्लेम, जीवनाशी तडजोड करण्याचे शिक्षण द्यावे. नेतृत्व करण्याची जिद्द, ज्ञान मिळविण्याची आस, भूक विद्यार्थ्यामध्ये निर्माण करावी. निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करावे. व्यक्तिगत मार्गदर्शन करणे एक दिवसाच्या कँपचेही आयोजन करता येते. रासेयोचे युनिट लहान असेल तर गावठी छोटच निवडावे. जास्तीत जास्त एक हजार वस्तीचे गाव निवडावे. 18 वर्षाच्या वरील वय असलेल्या ग्रामस्थांची ग्रामसभा आयोजित करावे. गाव निवडल्यानंतर प्रत्येक घरी विद्यार्थी घेऊन जावून गावातील घरांचा सर्वे करावा. एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ या उक्तीप्रमाणे कार्यक्रमाधिकाऱ्यांनी रासेयोचे वार्षिक शिबिर घ्यावे.

27 फेब्रुवारी 2018 म्हणजे समारोपाच्या आदल्या दिवसापासूनच गावाकडे जाण्याचे वेध सर्वांना लागले होते परंतु मैत्रीसुध्दा तेवढीच दृढ झाली होती जन्मो-जन्मीचे नाते असल्यासारखे वाटत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे आनंदाचे भाव झळाळत होते. आजच्या संध्याकाळी हॉस्टेलवर आल्यानंतर संध्याकाळचे जेवण संपल्यानंतर कोणीही झोपायचे नाही. कारण आपल्यामध्ये जे कांही सुप्त गुण असतील त्याचे सादरीकरण करण्याचे असे एकमुखी सर्वांचे ठरले. ठरल्याप्रमाणे संध्याकाळचे जेवण संपल्यानंतर काव्यवाचन, कथाकथन, गीतगायन, जोक सादर केले. आणि मनोरंजनाबरोबरच कोणामध्ये कोणते सुप्त गुण आहेत हे लक्षात आले.

28 फेब्रुवारी 2018 रोजी सकाळी 6.00 ते 7.00 योगा संपल्यानंतर स्नान करून मेसमध्ये जावून ब्रेकफास्ट घेतला. सर्वांना सकाळी 9.00 वाजताच बोलावले होते. अहमदनगर कॉलेज अहमदनगर येथील दिक्षांत समारंभाचा कार्यक्रम होता. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील प्रमुख पाहुणे परीक्षा नियंत्रक डॉ. अशोकराव चव्हाण येणार होते. त्याचबरोबर अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार होते. त्या कार्यक्रमासाठी आम्हांलाही अनिवार्य केले होते. सर्व पाहुणे मंडळी, विद्यार्थी विशेष अशा पोशाखामध्ये वाजत-गाजत कार्यक्रमाच्या सभागृहाकडे अगदी शिस्तमय पध्दतीने हलके हलके पाऊल टाकीत, चालत हातात पेटलेली ज्योत घेऊन व्यासपीठावर विराजमान झाले. ही पेटलेली ज्योत म्हणजे ज्ञानाची पवित्र ज्योत होती. अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अमूर्ताकडून मूर्ताकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे जीवनात तेवत राहणारी होती. त्याचबरोबर आदल्या दिवसाची रात्र संपवून सकाळी सूर्याच्या कोवळया सूर्यकिरणांनी कार्यक्रमाचे वातावरण तेजोमय झाले होते. सर्व प्रेक्षकांच्या व पदवी ग्रहण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य व आनंद झळाळत होता. अशा रम्य वातावरणात महाविद्यालयाचे गीत येथील विद्यार्थ्यांनी संगीतबध्द, स्वराबध्द, मधूर अशा गोड आवाजात सादर केले. यावेळी सर्वजण शिस्तीत उठून थांबलेले ही सर्व शिस्त आम्हांला बरेच काही शिकवून गेली. प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा राहिले. अगदी बोलणे सुध्दा मोजकेच होते प्राचार्य म्हणजे अभ्यासू शिस्तप्रिय दुसऱ्याचा आदर करणारे व्यासंगी, विद्वत्ता, तळमळ, चिकाटी, जिद्द, वक्तृत्व, हिंदी, इंग्रजी, मराठी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असणारे बहुभाषिक व्यक्तिमत्व आम्हांला मोजक्याच शब्दातून बरेच कांही सांगून गेले. अल्पाक्षर रमणीयत्व म्हटल्याप्रमाणे अगदी पाच मिनिटात आपले मनोगत संपवले आणि निमंत्रित पाहुण्यांना जास्त वेळ दिला. खरेच प्राचार्य असावे तर डॉ. आर. जे. बार्नबस सरांसारखे. एवढे शांत, मनमिळावू व्यक्तिमत्व, गर्व, अहंकार, न्यूनगंड, द्वेष, मत्सर या षड्रिपूपासून बारा कोस दूर असणारे व्यक्तिमत्व आहे. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. अशोकराव चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले यांची मधूर अशी वाणी ऐकून आमचे कान तृप्त झाले. राष्ट्रगीत म्हटल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर आम्ही परत आमच्या रासेयो विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये गेलो. दोन सत्र झाले. आम्हांला गावाकडे जाण्याचे वेध लागले होते. आता ऐकण्याची कोणाचीही मनस्थिती नव्हती. दुपारच्या सत्रात आमच्या समारोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. रासेयो समन्वयक डॉ. अभय शालीग्राम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमच्यापैकी प्रा. डॉ. दुशमुख सर, प्रा. डॉ. बालाजी डिगोळे, तर महिला प्रतिनिधी म्हणून प्रा. डॉ. देशपांडे मॅडम यांनी सर्वांची प्रतिनिधी म्हणून सात दिवसात जो कांही अनुभव आला ते मनोगतातून व्यक्त केले. यांनतर प्रमुख पाहुणे डॉ. शालीग्राम सरांनीही भाषण केले. कधीही मला हाक मारा, साधा एक फोन करा मी तुमच्यासाठी धावून येतो असे म्हणून सर्वांनाच आम्हांला भाऊक केले. खरेच हे मिळालेले प्रेम मी कधीच विसरू शकत नाही. यानंतर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आमचेच सहकारी मुंबई विद्यापीठातील रिझवी कॉलेज ब्रांद्रा येथील डॉ. अलकम, सी.के.टी.कॉलेज पनवेल येथील डॉ. योजना मॅडम यांनी केले. तर आभार ज्यांना आम्ही सात दिवस अध्यक्ष म्हणायचो ते प्रा.कल्लाप्पा चिकटे यांनी केले. असा निरोप समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. पुन्हा आम्ही 21 जण 21 गावचे 21 महाविद्यालयातील सात दिवस प्रेमाने जिव्हाळयाने राहणारे, एका झाडावर रात्रभर अनेक पाखरं राहतात आणि पुन्हा उठून आपापल्या दिशेने खोप्याकडे जातात. त्याप्रमाणे आपापल्या गावी निघून गेलो हे सात दिवस आयुष्यामध्ये कधीच न विसरणारे आहे. ते चिरंतर, अखंड, अक्षय ऱ्हदयात राहतील. कारण या सात दिवसात अनेक चांगले शिकता आले. ही शिदोरी आम्ही रासेयोच्या कार्यक्रमातून सामाजिक कार्यातून निश्चित विकसीत करणार आहोत.

अशा प्रकारे सात दिवसांच्या या कोर्समधून जो कांही मला आलेला अनुभव आणि आकलन झालेल्या व्याख्यानातून हा शोधनिबंध मी लिहिलेला आहे. बरेच अनुभव मांडण्याचे राहून गेले आहेत. मराठी विषयाचा मी शिक्षक असल्यामुळे इंग्रजी भाषेत झालेल्या व्याख्यांनाचा मी आढावा घेऊ शकलो नाही. ही माझ्या लेखनाची मर्यादा किंवा उणीव समजतो.

**निष्कर्ष :-**

1) ज्या गावात आपण शिबिर घेतो त्या गावातील समाजाला समजून घेऊन जनजागृती करणे.
2) खेडयातील माणसांच्या गरजा लक्षात घेऊन अडचणी समजून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करणे.
3) स्वयंसेवकामध्ये व आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जोपासना करून वृध्दिंगत करणे.
4) नैतिकता, चारित्र्य, स्वतंत्रता, समता, बंधूता, न्याय, सर्वधर्मसमभाव या लोकशाही मूल्यांनुसार वागणे आणि समाजात रूजवून विकसीत करणे.
5) अडाणी व शिकलेला यांच्यातील अंतर कमी करून राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करणे.
6) स्वच्छता, चांगले पर्यावरण वृक्षारोपण यासंबंधी स्वयंसेवकांच्या माध्यमातून जनजागृती करणे.
7) स्थानिक गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमांचे नियोजन करणे.
8) स्वयंसेवकांतील सुप्त गुणांना सादर करणे हे ध्येय ठेऊन व्यक्तिमत्व विकास करणे.
9) हुंडाबंदी, अधश्रध्दा निर्मुलन, बालविवाह, लोकसंख्या वाढ, व्यसनमुक्ती, आरोग्यविषयक जलसंवर्धन, बंधारे बांधणे, प्लॅस्टिक मुक्त, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी सामाजिक विषयासंबंधी समाजात जनजागृती निर्माण करणे.
10) समाजसेवा करणे, आपल्या जवकरून स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करून सक्षम नागरिक म्हणून उभा करण्याचा प्रयत्न करणे.

**संदर्भग्रंथः-**

1) अण्णा हजारे, 'मेरा गाँव मेरा तीर्थ', स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, प्रथमावृत्ती 2012
2) बाळासाहेब वाघ, 'ग्रामविकासाची पाऊलवाट राळेगणसिध्दी', मेडिया सेंटर, राळेगणसिध्दी.
3) Resource/Reading material sponsored by ministry of Youth Affaires & sports, New Delhi.
4) Volunteers work Diary, Ministry of Youth Affairs and Sports, Delhi.
5) 22 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारी 2018 या सात दिवसात मान्यवर मंडळीच्या व्याख्यानातून झालेल्या मार्गदर्शनातून घेतलेले टिपण.